**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक १३ डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **जुन्या लोकांना तातडीनं घरं देणे तसंच नवीन प्रकल्पांकरिता मुबलक घरं उपलब्ध होण्यासाठी हौसिंग स्टॉक निर्माण करण्याची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा.**
2. **बार्टी, सारथी, सारख्या संस्थांच्या योजनांसाठी मार्गदर्शक तत्वं निश्चित करण्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं आश्वासन.**
3. **अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना विविध मुद्यांवरून कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांची सरकारवर टीका.**
4. **राज्यातल्या रस्त्यांच्या कामासाठी दीड लाख कोटी रुपये मंजूर करण्यात आल्याची केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची माहिती.**
5. **अमरावतीच्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीनं देण्यात येणारा 'डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाहीर.**

---

विधान परिषद

जुन्या लोकांना तातडीनं घरं देणे तसेच नवीन प्रकल्पांकरिता मुबलक घरे उपलब्ध होण्यासाठी हौसिंग स्टॉक निर्माण करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधान परिषदेत केली. समाजातील गरीब गरजू घटकांना जसं गिरणी कामगार, डब्बेवाले, माथाडी इत्यादींना घरे देण्याचं धोरण शासनाने स्विकारलेलं आहे. या सर्वांना वेळेवर घरे देता यावी, याकरिता मोठ्या प्रमाणात राज्यस्तरावर हौसिंग स्टॉकची आवश्यकता लागणार आहे, आणि म्हणूनच याबाबतीत निर्णय घेण्यात आल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. याशिवाय अन्य महत्वाच्या घोषणा देखील शिंदे यांनी विधानपरिषदेत केल्या.. **ऐकूया हा वृत्तांत-**

***(व्हॉइस कास्ट - नम्रता)***

***नवी मुंबईतील सिडकोच्या वेगवेगळ्या प्रवर्गातील घरांसाठी सिडकोने जे दर निश्चित केले होते त्यामध्ये थेट १० टक्के कपात करण्यात येत असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी विधान परिषदेत निवेदनाद्वारे केली. या निर्णयामुळे आता ही घरे पूर्वीपेक्षा स्वस्त दरात उपलब्ध होतील. त्याचप्रमाणे मुंबईतील झोपडी खरेदी-***

*विक्रीच्या तांत्रिक अडचणीत अडकलेल्या नागरिकांसाठी 'एसआरए अभय योजने'ची मुदत आता डिसेंबर २०२६ पर्यंत वाढविण्याची घोषणा देखील शिंदेनी विधानपरिषदेत केली. सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दिलेल्या निकालानंतर राज्यातील 6 लाख शिक्षकांना शिक्षक पात्रता (टीईटी) द्यावी लागणार आहे. त्या धर्तीवर शालेय शिक्षण विभागाच्या वतीन सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करण्यास विधी विभागाला सांगण्यात येईल, अशी माहिती शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधान परिषद सभागृहात दिली. त्याचप्रमाणे शिक्षकांची अशैक्षणिक कामातून सुटका व्हावी आणि त्यांना अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळावा यासाठी शिक्षकांना अशैक्षणिक कामे देऊ नये अशा सूचना प्रधान सचिवांना देण्यात येईल असंही त्यांनी सांगितलं. केंद्र शासनाने दिनांक ३१/१२/२०२५ पर्यंत कापसावरील ११ टक्के आयात शुल्क माफ केले असून हंगाम २०२५-२६ मध्ये किमान आधारभूत योजनेंतर्गत सोयाबीन, उडीद, मूग आणि कापूस हमीभाव खरेदी सुरू करण्यात आली आहे. किमान आधारभूत योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचण्यासाठी संपूर्ण प्रसिध्दी करत असल्याचं मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितलं. याशिवाय यंदा कापूस खरेदी केंद्र 168 पर्यंत वाढविण्यात आले असून 156 केंद्र कार्यान्वित असल्याचही रावल यांनी सांगितल.*

---------------------------------------

विधान सभा

ब्रम्हपुरी पोलिस स्थानकातील उपविभागीय पोलिस अधिकारी राकेश जाधव याना तातडीने निलंबित कराव, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत केली. वाळू तस्करी प्रकरणात नियमबाह्य कारवाया आणि आर्थिक व्यवहारांचे आरोप करत वडेट्टीवार आक्रमक झाले आणि दिर्घेमध्ये उतरून कारवाईची मागणी केली. यावर गृहराज्यमंत्री यांनी संबंधित अधिकाऱ्याविरोधात विभागीय चौकशी सुरू असून, चौकशी पूर्ण झाल्यानंतर राकेश जाधव यांना पदावरून हटवण्यात येईल, अशी घोषणा केली. ऐकूया आजच्या विधानसभा कामकाजाचा वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून-

*(व्हॉइस कास्ट - नमता)*

*टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती आणि अमृत या स्वायत्त संस्थांच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचा लाभ अधिकाधिक गरजू आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा महायुती सरकारचा उद्देश*

*असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली. योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता, स्पष्ट निकष आणि मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली जाणार असल्याच त्यांनी सांगितलं. आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना प्राधान्याने मदत केली जाईल, असही त्यांनी स्पष्ट केलं. ३० मार्चपर्यंत जास्तीत जास्त निधी वितरित करण्याचा प्रयत्न असून उर्वरित निधी नियमित अर्थसंकल्पातून देण्यात येईल,अस आश्वासन पवार यांनी सभागृहात दिलं. दिनांक 30 ऑक्टोबर 2018 च्या शासन निर्णयानुसार अनुदानित महाविद्यालयातील रिक्त पदांपैकी 40 टक्के सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्यास मान्यता देण्यात आली होती, त्यापैकी 3०86 पदे भरण्यात आलेली असून उर्वरित 494 पदांच्या भरतीची प्रक्रिया सुरू असल्याचं उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितलं। या संदर्भातील प्रश्न आमदार प्रज्ञा सातव यांनी विचारला होता. अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये ११९१८ सहायक प्राध्यापक पदे रिक्त असून त्यापैकी ५०१२ पदांच्या भरतीस वित्त विभागाची मान्यता मिळाली आहे. राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील १४२२ रिक्त पदांपैकी ६२२ पदे भरण्यास मंजुरी देण्यात आली असून उर्वरित पदांसाठी वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, अशी माहिती मंत्र्यांनी दिली. नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथील तीन वर्षांच्या चिमुकलीवर झालेल्या अत्याचार आणि हत्येचा प्रश्न आज सभागृहात चर्चिला गेला. हे प्रकरण जलद गती न्यायालयात चालवून विशेष वकील लावला जाईल आणि गुन्हेगारांवर वचक बसेल यासाठी शासन प्रयत्न करेल असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. याबाबत सुहास कांदे, अतुल भातखळकर, दादाजी भुसे, किशोर आप्पा यांनी प्रश्न विचारले. दरम्यान, शिवराज विश्वनाथ पाटील चाकूरकर यांच्या निधनाबद्दल विधानसभेत शोक प्रस्ताव मांडण्यात आला. सर्व सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.*

---------------------------------------

अंतिम आठवडा प्रस्ताव

राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचं पाप महायुती सरकारचं आहे, अशी टीका अंतिम आठवड्याच्या प्रस्तावावर बोलताना काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. राज्यातील विविध गंभीर समस्यांवरून सत्ताधारी पक्षावर जोरदार टीका करत शेतकरी आत्महत्या, कृषी क्षेत्रातील निधीचा अपव्यय, ढासळलेली कायदा

आणि सुव्यवस्था, महिला आणि बालकांवरील वाढते अत्याचार तसेच भ्रष्टाचाराच्या मुद्द्यांवरून वडेट्टीवार यांनी सरकारवर हल्लाबोल केला.

**(होल्ड बाईट - विजय वडेट्टीवार - ४२ सेकंद)**

---------------------------------------

हलबा आंदोलन

नागपुरमध्ये हलबा समाजाचे आंदोलन गेल्या दोन दिवसांपासून उग्र झाले आहे. 'कोष्टी' हा व्यवसाय मान्य करून हलबा जातीचे प्रमाणपत्र देण्यात यावे, या मागणीसाठी हलबा समाजबांधव गेल्या सात दिवसांपासून उपोषणावर आहेत. सरकारकडून दखल न घेतल्याने आंदोलकांनी जलसमाधीचा इशारा दिला होता; मात्र पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून आंदोलकांना ताब्यात घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.

---------------------------------------

नितीन गडकरी

महाराष्ट्रातील रस्त्यांच्या कामासाठी दीड लाख कोटी रुपये मंजूर करण्यात आल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितलं. हे काम पुढल्या तीन महिन्यात सुरू होईल, असं ते म्हणाले. विधानपरिषदेच्या शताब्दी सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ते आज नागपुरात विधानभवन परिसरात उपस्थित होते, त्यावेळी त्यांनी वार्ताहरांशी संवाद साधला. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ १६ हजार ३१८ कोटी रुपयांचा पुणे ते संभाजीनगर महामार्ग बांधणार असून यासाठीच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाली आहे. या मार्गामुळे पुणे ते छत्रपती संभाजीनगरमधलं अंतर दोन तासांनी तसंच नागपूर ते छत्रपती संभाजीनगरमधलं अंतर अडीच तासांनी कमी होईल, असं गडकरी म्हणाले. त्याचप्रमाणे सध्याच्या मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला समांतर असणाऱ्या १५ हजार कोटी रुपये खर्चाच्या द्रुतगती मार्गामुळे दोन्ही शहरातलं अंतर दीड तासांनी कमी होईल, असंही गडकरी यांनी सांगितलं.

---------------------------------------

डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार

अमरावती इथल्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीनं देण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार' यंदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाहीर झाला आहे. राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. संस्थेचे अध्यक्ष

हर्षवर्धन देशमुख यांनी आज अमरावती इथं पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त आयोजित महोत्सवात विदर्भातील शेतकऱ्यांचाही सन्मान करण्यात येणार आहे. तर पाच लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात येणाऱ्या पुरस्काराचं स्वरूप आहे.

---------------------------------------

रामदास आठवले

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) गटाचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी आज नागपूरच्या विधान भवनात माध्यमांशी संवाद साधला. महायुतीमध्ये पक्षाला त्याच्या ताकदीप्रमाणे जागा मिळाव्यात, ज्या भागात रिपब्लिकन पक्षाचा प्रभाव आहे, तिथे निवडणूक लढविण्याची संधी द्यावी, अशी भूमिका त्यांनी मांडली. स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीसाठी जनतेनं पुढं येऊन संघर्ष करणे आवश्यक असल्याचही आठवले यांनी सांगितलं.

---------------------------------------

संसद हल्ला श्रद्धांजली

संसदेवर दहशतवादी हल्ला झाल्याला आज २४ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त या हल्ल्यात शहीद झालेल्यांना देश श्रद्धांजली वाहत आहे. २००१ मध्ये झालेल्या या हल्ल्यात संसदेचं रक्षण करताना हौतात्म्य पत्करलेल्या सुरक्षा रक्षकांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी श्रद्धांजली वाहिली. या शूरवीरांनी दाखवलेलं धैर्य, साहस आणि समर्पणाला राष्ट्र अभिवादन करत आहे, त्यांची कर्तव्यनिष्ठा देशाच्या राष्ट्रभावनेला सदैव मार्गदर्शन करत राहील, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

आशिया क्रिकेट चषक

दुबई येथे काल झालेल्या 19 वर्षांखालील युवकांच्या आशिया क्रिकेट चषक स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात भारतानं संयुक्त अरब अमिरातीचा 234 धावांनी पराभव केला. भारताचा पुढील सामना उद्यापाकिस्तानविरुद्ध होणार आहे.

---------------------------------------

हवामान

विदर्भात आज गोंदिया इथं नऊ पूर्णांक दोन दशांश अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. नागपूर आणि भंडारा इथं दहा, यवतमाळ इथं दहा पूर्णांक पाच, तर अमरावती इथं दहा पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे.